प्रहार
शुक्रवार, ७ ऑगस्ट २०१५

# सायकलने प्रवास करून 'खारफुटी'चे संशोधन!

## मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजय देशमुख यांनी उलगडला प्रेरणादायी प्रवास ■ कोकणातील आठवणींना उजाळा

▶ तेजस देसाई (दोडामार्ग)



परिस्थिती ही माणसाला संघर्ष करायला शिकवते आणि या संघर्षाच्या वाटचालीत यश असते, हे मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजय देशमुख यांच्या प्रवासाकडे पाहिल्यावर समजते. त्यांचा कोकणशी संबंध आला तो खारफुटी या वनस्पतीच्या संशोधनानिमित्त. त्यावेळी डॉ. देशमुखांकडे वाहन म्हणून फिरण्यासाठी फक्त सायकल होती. आपणाला अभ्यास करायचा आहे तर फिरले पाहिजे यासाठी सायकलने सुमारे ५० हजार किलोमीटर प्रवास करून संशोधन केले.

दोडामार्ग येथील लक्ष्मीबाई हळबे महाविदयालयात डॉ. देशमुख आले असता त्यांच्याशी संवाद साधता आला. मुंबई विदयापीठाचे आजतागायतचे ते तरूण कुलगुरू असून त्यांच्या वाटचालीचा प्रवास थक्क करणारा असाच आहे.

लक्ष्मीबाई हळबे महाविद्यालयातील विद्यार्थ्यांशी संवाद साधल्यानंतर डॉ. देशमुख यांनी पत्रकारांशी मनमोकळा संवाद साधला. डॉ. देशमुख यांनी कठीण आणि खडतर परिस्थिती पाहिली. पण त्यांच्या मित्रांनी (पान २ वर)

### विनाअनुदानित महाविद्यालयांचा प्रश्न सोडविणार!

आज पूर्वीच्या तुलनेत शिक्षणक्षेत्रात बदल होत आहेत. काही महाविद्यालये विनाअनुदानीत तत्त्वावर असून सुध्दा उत्कृष्ट काम करीत आहेत. अशांना शासन निधीत समावेश करता येईल काय? हा प्रश्न आपल्या विचारात आहे. त्यासंबधीचा पाठपुरावाही करणार आहे व विनाअनुदान तत्त्वावर जी महाविद्यालये काम करीत आहेत त्यांचे प्रश्न सोडविणार आहे.